तरुण भारत ■ शनिवार, १७ डिसेंबर २०२२

# दोडामार्ग महाविद्यालयात हवामान बदल चर्चासत्र

प्रतिनिधी
दोडामार्ग

दोडामार्ग हळबे महाविद्यालयात २१ व २२ डिसेंबरला अर्थशास्त्र विभागातर्फे आयसीएसएसआर मुंबई पुरस्कृत 'हवामान बदल आणि भारतीय शेती' या विषयावर आंतरविद्या दोन दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. २१ डिसेंबरला सकाळी ९ वाजता नावनोंदणी आणि १० वाजता राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून दापोली कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत उपस्थित राहणार आहेत. २२ डिसेंबरला सायंकाळी ४ वाजता कार्यक्रमाची सांगता होणार आहे. राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोपासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून दापोली कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधक संचालक डॉ. संजय भावे उपस्थित राहणार आहेत. उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी केले.